*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने धाबा येथे सांस्कृतीक सभागृहाच्या बांधकामासाठी 97 लक्ष 83 हजार रू. निधी मंजूर*

*अर्थमंत्र्यांनी दिलेला शब्द केला पूर्ण*
===================================================

अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने गोंडपिपरी तालुक्यातील श्री संत परमहंस कोंडय्या महाराज संस्थान, धाबा येथे सांस्कृतीक सभागृहाच्या बांधकामासाठी 97 लक्ष 83 हजार रू. इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. शासनाच्या पर्यटन व सांस्कृतीक कार्य विभागाने दिनांक 31 ऑक्टोबर 2018 रोजी याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार ॲड. संजय धोटे आणि जिल्हा परिषद सदस्या सौ. वैष्णवी बोडलावार यांच्या मागणीच्या अनुषंगाने अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिलेला शब्द पूर्ण केला आहे.

गोंडपिपरी तालुक्यातील श्री क्षेत्र धाबा येथील संत परमहंस कोंडय्या महाराज संस्थान येथे सांस्कृतीक सभागृहाचे बांधकाम करण्याची मागणी राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार ॲड. संजय धोटे आणि जिल्हा परिषद सदस्या सौ. वैष्णवी बोडलावार यांनी एका कार्यक्रमात अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे केली होती. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी त्यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली असून पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी प्रादेशिक पर्यटन योजनेअंतर्गत सदर निधी मंजूर करण्यात आला आहे. धाबा येथील संत परमहंस कोंडय्या महाराज संस्थान अतिशय प्रसिध्द तिर्थस्थळ व पर्यटन स्थळ असून या ठिकाणी मोठया प्रमाणावर भाविक दर्शनासाठी येत असतात. प्रत्येक माघ शुध्द तृतीयेला या ठिकाणी मोठी यात्रा भरते. याठिकाणी भाविकांच्या सोयीच्या दृष्टीने सांस्कृतीक सभागृहाची मागणी करण्यात आली. या मागणीची पूर्तता झाली असून लवकरच या सभागृहाच्या बांधकामाला सुरूवात होणार आहे.